लवाद नि.वसुली अर्ज क्रं.१८६/२०१६
श्रीराम ट्रान्स वि. माधव

**नि.क्रं. ४५ खाली आदेश**

सदर कामी दरखास्तदार यांनी अर्ज देऊन नमूद केले की, जाबदार क्रं. १ याला नोटीस काढण्यात आली होती. मात्र तो हजर झाला नाही. त्याच्याविरुध्द वसुलीवारंट काढण्यात आले, जप्तीवारंट काढण्यात आले. मात्र तरीही तो आला नाही. जाबदार क्रं. १ यास त्याच्याविरुध्दचे कर्ज भागविण्यासाठी पुरेसा स्त्रोत असूनही तो रक्कम भरत नाही. त्यामुळे त्याला दिवाणी तुरंगात ठेवण्यात यावे अशी विनंती करण्यात आली. सोबत नि.क्रं.४६ लगत शपथपत्र देण्यात आले.

२. जाबदार याने नि.क्रं.४७ ल गत अर्ज देऊन वरील अर्जावर म्हणणे देण्यासाठी मुदत मागितली.

३. याकामी प्रकरण पाहता जाबदार क्रं. १ विरुध्द ३०/०४/२०२२ रोजी प्रकरण एकतर्फा चालण्याचा आदेश झाला. वेळोवेळी त्याच्याविरुध्द जप्तीवारंट काढण्यात आले. जाबदार क्रं. १ हा शिरुर ताजबंद गावी राहत नाही, तो कुठे राहतो हे कोणालाही माहीत नाही असे बेलीफ अहवाल आहे. जाबदार क्रं. १ हा न्यायालयात आज सकाळी ११ वाजता दोन व्यक्तींसह आला. त्यावेळी या प्रकरणी तडजोड होऊ शकते का याबद्दल विचार करण्यासाठी त्यांना मुदत दिली. दुपारी १ वाजेच्या दरम्यान जाबदारच्या वतीने वकीलपत्र देण्यात आले व जाबदारास जबरदस्तीने धरुन बांधून रात्रभर डांबून ठेवून जाबदार क्रं. २ च्या पत्नीने व सास-याने अन्य पाच-सहा लोकांच्या मदतीने ठेवले होते असा अर्ज दिला. त्यावर अर्जदाराचे म्हणणे घेण्यात आले व तो अर्ज जाबदार क्रं. १ याने आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी असे नमूद करुन रद्द करण्यात आला.

४. जाबदार यास नोटीस बजावूनही हजर न राहिल्याने आणि त्याने कुठल्याही परिस्थीतीत रक्कम जमा न केल्याने शेवटचा पर्याय म्हणून प्रस्तुत अर्ज दिला. त्यावर त्याचे म्हणणे मागविले. असे म्हणणे न देता त्याने मुदत मागितली. त्यामुळे दि.प्र.संहीता १९०८ क्रम २१ नियम ३७ चे पालन झाले आहे. तसेच तो न्यायालयासमोर हजर असल्याने त्याला

अटक का करु नये याची कारणे दाखविण्यासाठी संधी दिलेली आहे. दि.प्र.संहीता १९०८ क्रम २१ नियम ४० (1) नुसार दरखास्तदार व जाबदार यांना समान संधी देऊन दिवाणी तुरुंगवास जाबदार क्रं. १ यास दयावा की न दयावा याबद्दल निष्कर्ष आवश्यक आहे. असा निष्कर्ष काढेपर्यंत दि.प्र.संहीता १९०८ क्रम २१ नियम ४० उपनियम २ मधील तरतुदीनुसार न्यायालय स्वतच्या मर्जीत जाबदारास न्यायालयीन कर्मचा-याच्या ताब्यात ठेऊ शकते किंवा त्याने योग्य तो जामीन दिल्यास ( Security ) त्यास विशीष्ट तारखेला हजर राहण्याच्या अटींवर सोडू शकते.

५. सदर बाब जाबदार क्रं. १ यास सकाळच्या सत्रात सांगण्यात आली होती मात्र सदरचा आदेश होईपर्यंत त्याने जामीन दिलेला नाही. त्याचा पत्तामेमो पाहता शिरुर ताजबंद ता. अहमदपूर असा पत्ता त्याने दिला आहे. मात्र प्रकरणातील बेलीफ अहवाल पाहता त्या ठिकाणी तो राहत नाही असेच ब-याचदा दिसून आले आहे. तसेच आपण लातूर येथे राहतो . सिमा माधव बिराजदार, कळंब रोड, रेल्वे गेटच्या बाजूला, एम.आय.डी.सी.च्या मागे लातूर. येथे आपण राहतो असे त्याने सांगितले. आपली बहीण शिरुर ताजबंद येथे शिक्षीका असून ती संध्याकाळी पाच पर्यंत येऊ शकेल असे सुरवातीला सांगितले. त्यानंतर आपली घटस्फोटीत पत्नी येत आहे असेही सांगितले. सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत जाबदार क्रं. १ याचे जामीनासाठी ( Security ) साठी न्यायालयात कोणी हजर राहते का याची वाट पाहण्यात येईल. जाबदारास पुरेपुर संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे यापुढील आदेश सायंकाळी ५:३० वाजल्यानंतर करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

दि.३०/०१/२०२६

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.